ई महाभूमि

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (म.राज्य ), पुणे
दूसरा व तिसरा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधानभवन समोर, कॅम्प, पुणे
**दूरध्वनी** क्र. ०२०-२६१३७११ Web site: https://mahabhumi.gov.in

---

जा.क्र./तलाठी भरती/प्र.क्र/२०५/२०२३ दि. १६/०७/२०२३

## -: प्रसिध्दी :-

**विषय:-** महसूल विभागातील गट क संवर्गातील तलाठी भरती सन २०२३.
**१. मुक्त विद्यापीठातील पदवी धारण करणाऱ्या उमेदवारांबाबत.**
**२. ऑनलाईन संकेतस्थळावर Capture Photo अपलोड करणेबाबत.**

**संदर्भ:-** १. कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग, यांचेकडील पत्र क्र. संकिर्ण २०२३/प्र.क्र. ९३/ई-१० दि.१४/०७/२०२३
२. शासन निर्णय क्र. आरजीडी-१५११/प्र.क्र.८९/१३ दि. २० मे, २०११.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक (YCMOU), इंदीरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली (IGNOU) तसेच इतर मुक्त विद्यापीठामधून माध्यमिक शालांत परीक्षा, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा, पदवीका परीक्षा उत्तीर्ण नसतानाही वरील विद्यापीठांची पदवी धारण करणाऱ्या उमेदवारांना तलाठी पदभरती प्रक्रियेमध्ये पात्र ठरविण्याबाबत संदर्भिय पत्रांमध्ये नमूद करणेत आलेले आहे.

त्याअनुषंगाने तलाठी भरती सन २०२३ साठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी सदर मुक्त विद्यापीठातील पदवी धारण केली असल्यास त्यांना ऑनलाईन संकेतस्थळावर अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देणेत आलेली आहे. तसेच ज्या उमेदवारांनी ऑनलाईन संकेतस्थळावर अर्ज यशस्वीरीत्या सबमिट केलेला आहे परंतु Capture Photo अपलोड केलेला नाही त्यांना सदर फोटो अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध करून देणेत आलेली आहे.

**स्वाक्षरी/- xxx**
**(आनंद रायते )** (भा.प्र.से)
**अपर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक**
**भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे**